जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
फेर जाहीर निविदा

या जाहीर निविदेद्वारे तमाम फर्निचर पुरवठादारांना कळविण्यांत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व या न्यायालयाचे अंतर्गत असलेल्या तालुका न्यायालयांस खालील तपशीलाप्रमाणे लोखंडी कपाट खरेदी करावयाचे आहे. तरी याकामी ज्या पुरवठादारांना सदर फर्निचर पुरविण्यात स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद पाकिटात मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांचे नावाने पाकिटावर "कार्यालयीन फर्निचर पुरविणेबाबतचे दरपत्रक" असे नमुद करुन पाकीटे प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव यांचे कक्ष क. 101 मध्ये दिनांक 28/10/2025 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून द्यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. एकूण प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 29/10/2025 रोजी मा. जिल्हा न्यायाधीश–1, जळगांव यांचे समक्ष त्यांच्या निजी कक्षात उघडले जातील.

कार्यालयीन उपयोगाकरीता लागणारे कार्यालयीन फर्निचर खालील प्रमाणे उधारीवर खरेदी करावयाची आहेत.

खरेदी करावयाच्या वस्तु व तपशील	संख्या
लोखंडी कपाट **Steel Cupboard (Major) (Powder Coated) Size : 1980 X 915 X 485 mm** पाच खण 4 सेल्फ असलेले, सर्व बाजूचे 20 गेज व दरवाजे 18 गेज	83

सर्वसाधारण अटी.

1 दरपत्रक स्विकृत केल्यावर पुरवठा आदेश दिल्यानंतर सदरचे साहित्य त्वरीत पुरवावे. सदरील साहित्याचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा असावा, दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा नसल्यास स्विकाराला जाणार नाही.

2 ज्या पुरवठादाराचे दरपत्रक मंजुर केले जातील त्यांनी निविदेत नमुद केल्या प्रमाणे सदर कपाटाचा नमुना म्हणून एक कपाट सर्व प्रथम या कार्यालयास तयार करुन दाखविण्यात यावे. सोबत गेज मीटर आणावे. सदर कपाटाची या कार्यालयाकडुन गेज मिटर व इतर आवश्यक साहित्या मार्फत तपासणी केली जाईल तद्नंतर सदरचे कपाट उक्त नमुद गेजचे आढळुन आल्यास या कार्यालयाकडुन मंजुरी दिल्यानंतर उर्वरित कपाटे तयार करण्यास सुरूवात करावी.

3 सदरचे साहित्य कार्यालयीन वेळेत जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव तसेच जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिपत्याखालील सर्व तालुका न्यायालयात स्वखर्चाने या कार्यालयाकडुन कळविल्याप्रमाणे पोहोच करावी.

4 दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यांत आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

5 सदरील साहित्य कार्यालयात पोहोचवून दिल्यावर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे.

6 दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी चा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते. त्या अटीस

आधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बीलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी. डी.एस. कपात करण्यात येईल.

7 उपरोक्त साहित्य अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साो., जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. उपरोक्त वस्तु उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

8 दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

9 दरपत्रकातील दर दिनांक 31/03/2026 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरवठा केला जाईल, त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट नमुद करावा.

10 नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साो.,जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

11 पुरवठा करण्यात येणा–या कपाटाच्या वरच्या भागाच्या उजव्या कोप–यात या कार्यालया–कडुन पुरविण्यात येणारे नाव व नंबर सदरील कपाटावर रंगाने स्वखर्चाने टाकुन द्यावे लागेल.

12 या कार्यालयास पुरविण्यात येणा–या कपाटास पुरवठादाराकडुन कमीत–कमी 5 वर्षांची लेखी गॅरंटी दयावी लागेल. सदर कपाटाचा रंग, लॉक तसेच पत्रा वाकणे किंवा इतर कोणतीही समस्या निर्माण झाल्यास संपुर्ण कपाट पुरवठादारास स्वखर्चाने या कार्यालया–कडुन सुचित केलेपासुन 24 तासांचे आत दुरूस्त करून दयावे लागेल. सदर कपाट दुरूस्त होणे शक्य नसल्यास संपुर्ण कपाट नविन दयावे लागेल. तसे न केल्यास पुरवठादारास या कार्यालयाकडुन काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

V.S.Kamkar

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

म.जा.क.रोखशाखा/५७७१/2025
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक 13/10/2025.

<u>प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.</u>

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा न्यायालय, जळगांव संकेतस्थळावर